महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील वरिष्ठ लिपिकाची २ पदे सरळसेवेने भरण्याकरिता प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

शासन निर्णय, क्रमांक सासंस-२०१७/प्र.क्र.१०४/आस्था-२,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६.०६.२०१९

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आ.पू.क., दि.०९.०६.२०१७
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे क्र. सासंम-२०१७/४५३३, दि. १२.०९.२०१७ चे पत्र.
३) वित्त विभाग, पृष्ठांकन, क्र.पदनि-२०१८/प्र.क्र.१०६/आ.पु.क., दि. २९.१०.२०१८

<u>शासन आदेश</u>

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील वरिष्ठ लिपिक संवर्गात सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेली २ पदे तातडीने भरण्याची आवश्यकता असल्याचे वरील संदर्भ २ अन्वये सदर मंडळाकडून निदर्शनास आणले असून याबाबतच्या छाननीअंती या संदर्भात वरील संदर्भ १ येथील उप समितीच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरची पदे भरण्यास वर संदर्भ १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये गठीत उप समितीने तिच्या दि.२६.१०.२०१८ च्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन सदरची वरिष्ठ लिपिक संवर्गातील २ पदे सरळसेवेने भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी विहित पद्धतीने सदरची पदे भरण्याची कार्यवाही करावी.

हा निर्णय वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ, क्र.६५१/१८, दि.०६.०३.२०१९ अन्वये दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१९०६०४१५४५०६८२३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANGESH PARSHURAM KUDTARKAR

Digitally signed by MANGESH PARSHURAM KUDTARKAR
Date: 2019.06.06 11:19:48 +05'30'

(मं. प. कुडतकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. उपसचिव, वित्त विभाग (आ.पु.क.)/(व्यय-४), मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
६. अवर सचिव, मराठी भाषा विभाग (भाषा-३/अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
7. निवडनस्ती.